भीष्म फाउंडेशन स्कूल ऑफ इंडियन नॉलेज सिस्टम, पुणे

विश्व मंदिर परिषद

भीष्म १०८ सोमयाग यज्ञ प्रकल्प

# अत्यग्निष्टोम सोमयाग यज्ञ, येडशी

## श्री रामेश्वर देवस्थान, येडशी, जि.धाराशिव, महाराष्ट्र

**२९ मार्च २०२६ ते ३ एप्रिल २०२६**





• श्री रामेश्वर महादेव •





आशीर्वाद

प.पू. स्वामी गोविंददेव गिरी महाराज



ह.भ.प.गु वै.रामचंद्र आबा बोधले



• ह.भ.प.गु.वै.रामकृष्णभाऊ येडशीकर
• ह.भ.प.गु.वै.भगवानभाऊ येडशीकर

• संपूर्ण विश्वाचे कल्याण • दैवी ऊर्जेची अनुभूती • ऋतू चक्रांचे संतुलन • पंच महाभूतांचे संतुलन • पर्यावरण आणि वायुमंडलाचे शुद्धीकरण • वैयक्तिक आरोग्यप्राप्ती, आभा(ऑरा), पंचकोशीय शुद्धी • भूमी - जल पोषण सुधार आणि शुद्धीकरण • सत्संग, नामसंकीर्तन आणि कीर्तन, प्रवचन कार्यक्रम

### ◆ येडशी सोमयाग स्थानिक समिती ◆

| | | |
|---|---|---|
| • ह.भ.प. कैलास महाराज दिवाणे | अध्यक्ष | 7499384175 |
| • वे.मू. धनेश लालासाहेब जोशी | उपाध्यक्ष | 9421448452 |

### यज्ञ स्थळ

श्री रामेश्वर देवस्थान, रामकृष्णभाऊ भगवानभाऊ मुख्य समाधी मंदीर, दुर्गादेवी रोड, येडशी, ता.जि.धाराशिव

**• सर्वांनी या दैवी यज्ञामधे सहभागी व्हावे असे आग्रही निमंत्रण •**

संपर्क : 9307198772 / 9850752468 / 8888032344

अधिक माहितीसाठी भेट द्या : www.108somyag.bhishmaiks.org

।। श्री ।।




।। श्रीपाद श्रीवल्लभ ।।




।। श्री नृसिंह सरस्वती ।।



।। श्री दत्तात्रय ।।



।। श्री स्वामी समर्थ ।।



।। श्री भगवान परशुराम ।।

# भीष्म १०८ सोमयाग यज्ञ प्रकल्प

सनातन वैदिक हिंदू संस्कृती ही मूलतः यज्ञसंस्कृती आहे. यज्ञ ही एक संस्था आहे, एक संस्कृती आहे आणि यज्ञ हाच धर्म आहे. वेदोक्त यज्ञांचे संपादन हे मानव समाजाला स्थिर आणि सुरक्षित ठेवण्याचे एकमेव साधन आहे. यज्ञासाठी लागणारे सामूहिक प्रयत्न, समाजातील सर्व घटकांचे परस्पर सहकार्य, अध्यात्मिकता, तसेच अन्न-धनाची व्यवस्था, श्रम, संसाधनांचा योग्य उपयोग हे सर्व घटक समाजात यज्ञाला केंद्रस्थानी ठेवून वितरित आणि प्रवाहित होत होते. यज्ञांचे अनेक प्रकार आहेत. मुख्यत्वे: १) श्रौत यज्ञ २) स्मार्त यज्ञ ३) गृह्य यज्ञ. स्मार्त व गृह्य यज्ञ हे इच्छा-कामना पूर्ण करण्यासाठी केले जातात.

सोमयज्ञ म्हणजेच सोमयाग. हा विश्वकल्याणासाठी व वैश्विक संतुलनासाठी केला जाणारा श्रौत यज्ञ आहे. या यज्ञात सोमरसाची आहुती दिली जाते. सोमयाग ही विश्व आणि ब्रह्मांडाचे संतुलन राखणारी अतिप्राचीन वैज्ञानिक प्रणाली आहे. पंचमहाभूत – पृथ्वी, वायू जल, अग्नी व आकाश – यांना शुद्ध करणारी ही अद्भुत दैवी प्रक्रिया आहे. प्राचीन भारतात हिमालय, सह्याद्री इत्यादी पर्वतरांगांमध्ये मिळणाऱ्या दुर्लभ सोमवल्ली वनस्पतीपासून सोमरस तयार करून हजारो सोमयाग मोठ्या प्रमाणात होत असत. प्राचीन भारताची अफाट समृद्धी आणि घरोघरी सोन्याचा धूर येत होता, यामागे सोमयाग परंपरेचे मोठे योगदान होते. पण कालांतराने ही ज्ञानपरंपरा लुप्त झाली.

आज विश्व आणि मानवजात अनेक संकटांनी त्रस्त आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे ओझोन वायूचा संरक्षक स्तर फाटला आहे. शेतीमध्ये रासायनिक खतांचा मारा करून आपण विषयुक्त अन्न तयार करीत आहोत. विविध देशांमध्ये युद्धे सुरू आहेत. संस्कार आणि संस्कृतीचे पतन होत असून कुटुंबव्यवस्था आणि समाजजीवन नष्ट होत आहे. त्यामुळे सामाजिक-आर्थिक समस्या, प्रदूषण, विषयुक्त अन्न, महामारी, त्सुनामी यांसारखे संकटे सातत्याने वाढत आहेत.

**या सर्व समस्यांवर संपूर्णत: वैदिक पद्धतीने – चारही वेदांनुसार केला जाणारा सोमयाग ( वेद म्हणजे श्रुती, त्याअनुसार म्हणून श्रौतयाग ) हे एक संपूर्ण समाधान आहे, असा आमचा विश्वास आहे.**

या कठीण आणि आव्हानात्मक काळात मानवजातीच्या संरक्षक व उत्थानासाठी, सनातन वैदिक हिंदू धर्माची पुर्नप्रतिष्ठापना करण्यासाठी आणि सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय या भावनेने भीष्म फाउंडेशनने इ.स. २०२६ ते इ.स. २०३५ या कालावधीत १०८ सोमयागांचे आयोजन करण्याचा संकल्प केला आहे. या दैवी महाप्रकल्पात सहकार्य करण्यासाठी, हातभार लावण्यासाठी आम्ही आपणा सर्वांना विनंती आणि आवाहन करीत आहोत.

प्रा. क्षितीज पाटुकले

संस्थापक – भीष्म फाउंडेशन स्कूल ऑफ इंडियन नॉलेज सिस्टम, पुणे

## • मार्गदर्शक मंडळ •



डॉ. विजय भटकर



डॉ. भाग्यलता पाटसकर



डॉ. चारुदत्तबुवा आफळे




डॉ. माधुरी शरन (अमेरिका)




प्रा. क्षितिज पाटुकले

# भीष्म १०८ सोमयाग यज्ञ प्रकल्प प्रेरणा


प. पू. गुळवणी महाराज


पू. नाना काळे




श्री गजानन महाराज


श्रीधर स्वामी

## विनम्र आवाहन

या सोमयागा दरम्यान देवी देवता यज्ञ १) नवचंडी होम २) रुद्रयाग ३) विष्णू दत्त याग ४) धन्वंतरी आरोग्य याग होणार आहेत. तसेच रोज नित्य सायं सामूहिक श्रीसुक्त हवन ही होणार आहे. आपण या दैवी कार्याला तन, मन, धनाने हातभार लावावा आणि या यज्ञ सेवेमध्ये सहभागी व्हावे अशी सर्वांना नम्र विनंती आहे. आपण खालील प्रकारे सहभागी होऊ शकता.

१) सोमयाग यजमान
२) देवी देवता यज्ञयाग यजमान
३) अन्नदान
४) यज्ञ सेवा देणगी
५) साहित्य, धान्य रूपाने देणगी

यज्ञेनाऽप्यायिता देवा वृष्टयुत्सर्गेण मानवाः।
आप्यायनं वै कुर्वन्ति यज्ञाः कल्याणहेतवः।।

श्रद्धां मेधां यशः प्रज्ञां विद्यां पुष्टिं श्रियं बलम्।
तेज आयुष्यमारोग्यं देहि मे हव्यवाहन।।
















- **आहिताग्नी डॉ. ओंकार यशवंत सेलूकर**
  ( सहायक आचार्य – वेद विभाग)
  श्री लाल बहादुर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विश्वविद्यालय, नवी दिल्ली
- **सोमपिथीनी सौ. राजश्री ओंकार सेलूकर**
  ( एम.ए. आणि संगीत विशारद– हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत)

## ◆ श्री रामेश्वर देवस्थान येडशी (वेदश्री) ता. जि. धाराशिव ◆

येडशी हे धाराशिव तालुक्यातील रामलिंग देवस्थानाच्या परिसरातील निसर्ग सौंदर्याने नटलेले एक रमणीय असे गाव आहे. येडशी या गावाचे पूर्वीचे नाव वेदश्री असे होते. काळाच्या ओघात अपभ्रंश होऊन वेदश्रीचे येडशी झाले. शेकडो संत महात्मे आणि अधिकारी पुरुषांच्या पदस्पर्शाने ही भूमी पवित्र आणि पावन झालेली आहे. याच येडशीमध्ये सद्गुरू कृपाप्राप्त असे दोन महात्मे १) वै. रामकृष्णभाऊ व २) वै. भगवानभाऊ महाराज होऊन गेले. त्या दोघांमध्ये भावाभावांचे नाते होते. या महात्म्यांनी येडशी परिसरामध्ये भजन किर्तनाच्या माध्यमातून ज्ञानदानाचे अभूतपूर्व कार्य केले. आळंदी, पंढरपूर व संपूर्ण महाराष्ट्रभर किर्तन भजनाची व ज्ञानदानाची सेवा केली. परमार्थ हेच महाधन समजून अखंड भगवंताची सेवा केली. धर्मसम्राट स्वामी करपात्री महाराजांनी काशीवरुन श्री रामेश्वर महादेवाची पिंड आणून पू. शंकराचार्य (शृंगेरी व करवीर पीठ), धारुरकर शास्त्री, बंकटस्वामी महाराज, परभणीकर गुरुजी आदि महात्म्यांच्या हस्ते श्री रामेश्वर महादेवांची प्राणप्रतिष्ठा केली. याठिकाणी अनेक वर्ष भजन व प्रत्येक अमावस्येला किर्तन व अधिक मासामध्ये सप्ताह व अन्नदान होत होते.



ह.भ.प. कैलास महाराज दिवाणे



वेदमूर्ती धनेश जोशी



वेदमूर्ती मंगेश बावीकर गुरुजी

श्री रामेश्वर महादेवांच्या अखंड वास्तव्याने आणि संत महात्म्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या क्षेत्राच्या ठिकाणी अत्यग्निष्टोम सोमयाग यज्ञाचे आयोजन केले आहे. या सोमयागामध्ये वैदिक मंत्रांचे जे उच्चारण होते, त्यातून एक विलक्षण आणि अद्भुत दैवी ऊर्जेची अनुभूती या यज्ञादरम्यान घेता येईल. विश्व कल्याण आणि विश्व शांति हा या यज्ञाचा मुख्य उद्देश आहे. ऋतुचक्रांचे संतुलन, पंच महाभूतांचे संतुलन, वातावरणाचे – पर्यावरणाचे शुद्धीकरण, ग्लोबल वॉर्मिंग पासून मुक्ती, वैश्विक ऊर्जेचे संतुलन करण्यासाठी या यज्ञाचे आयोजन केले आहे. यासोबतच प्रत्येक व्यक्तीच्या आरोग्य प्राप्ती, समाधान, सुख–समृद्धी, व्यक्तिगत वायुमंडल अर्थात आभा (ऑरा) शुद्धी, पंचकोशीय शुद्धी, पारिवारिक सुख–समृद्धीसाठी हा यज्ञ अत्यंत लाभकारक आहे. **या सोमयागामध्ये ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद या चार वेदांमधील मंत्रांचे पठण केले जाते.** हविर्द्रव्याच्या आहुतीने मंत्रजागर आणि अरोमा थेरपीने (गंधचिकित्सा) सहभागी यजमानांचे शारीरिक स्वास्थ्य आणि मानसिक रोग सुधारण्याकरिता मदत करते.आपण सर्वांनी आपल्यापरिवारासह आणि इष्टमित्रांसह या दैवी यज्ञामध्ये सहभागी व्हावे अशी विनंती आहे.

---


Bhishma School of Indian Knowledge System
भीष्म

## भीष्म स्कूल ऑफ इंडियन नॉलेज सिस्टीम, पुणे

### • विश्व मंदिर परिषद •

|| संस्कृतिः मंदिराश्रिता ||

622, जानकी रघुनाथ बिल्डिंग, कोहिनुर टेक्निकल इन्स्टिट्यूटच्या मागे, डिसीसी लॅपटॉप मॉल जवळ,
झेड ब्रिज जवळ, जंगली महाराज रोड, पुलाचीवाडी, डेक्कन जिमखाना, पुणे – 411004

श्री. महेश शेंद्रे : 9323696633